महाराष्ट्र शासन
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. :तंशिविकापु/शै.वि. ५/टीक्युब/२०२४-२५/ 4242
दिनांक : 21 OCT 2024

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य, /संचालक
शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने ,
पुणे विभाग

**विषय :** जर्मनीतील बाडेन-बुटेनबर्ग राज्यास महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत...

**संदर्भ :** १. शा.नि.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. कौशल्य-२०२४/प्र.क्र.५१/एसडी-६दि.११/०७/२०२४
२. संचालनालयाचे का.आ.क्र.१७/तंशिसं/वुटेनबर्ग/तांत्रिक समिती/२०२४/१३५,दि. २९ जुलै,२०२४
३. संचालनालयाचे पत्र क्र.DTEM-D१७०TEQP/१०९/२०२४-DESK१७,दि.२९ जुलै २०२४
४.शासन परीपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.(१०१/२४)तांशि-१,दि.१५ ऑक्टो.२०२४
५. संचालनालयाचे पत्र क्र.DTEM-D१७०TEQP/१३१/२०२४-DESK१७,दि. १७ ऑक्टो.२०२४

उपरोक्त विषयांस अनुसरून संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने या विभागाच्या अधिनस्त सर्व संस्थांच्या संस्था प्रमुखांना सूचित करण्यांत येते की, या परिपत्रकासोबत जोडलेल्या सहपत्राचे अवलोकन करून त्यानुसार कार्यवाही करावी.

महाराष्ट्र राज्यातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरवठा युरोपियन देशांना करून त्यायोगे कुशल कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने जर्मनीतील बाडेन-बुटेनबर्ग राज्य यांचेशी दि. २५/०२/२०२४ रोजी सामंजस्य करार केलेला आहे. या कराराच्या अनुषंगाने जर्मनीतील बाडेन-बुटेनबर्ग राज्यास ज्या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरवावयाचे आहे ती क्षेत्रे तसेच या पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने यंत्रणा,प्रशिक्षण व्यवस्था व कार्यपध्दती उपरोक्त संदर्भाधिन दि. ११ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेली आहे. त्या अनुषंगाने सदरचा पथदर्शी प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आपणांस संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये कळविण्यांत आलेले आहे.

तसेच सदरच्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती,राज्यस्तरीय सनियंत्रण समिती, व ट्रेडनिहाय तांत्रिक समिती विहीत करण्यांत आलेली आहे. त्या अनुषंगाने सदरच्या शासन निर्णयातील अ.क्र. २ (क) (३) मध्ये नमूद केलेल्या ट्रेड साठी संदर्भ क्र. २ च्या दिनांक २९ जुलै, २०२४ च्या कार्यालयीन आदेशान्वये संचालनालय स्तरावरून तांत्रिक समिती गठीत करण्यांत आलेली आहे.

राज्यस्तरीय कृतीदलाच्या दि. १/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार उमेदवारांची नोंदणी व प्रशिक्षण याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सहयोग द्यावा असा निर्णय घेण्यांत आलेला असून, त्यास अनुसरून या विभागाच्या अधिनस्त शासकीय तसेच अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने यांना कळविण्यांत येते की आपल्या संस्थेने संदर्भ क्र. ४ च्या शासन परिपत्रकामधील अनुक्रमांक २ अन्वये कार्यवाही केल्यानंतर तपशीलवार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या Google Form मध्ये सदर माहिती दि.२४/१०/२०२४ रोजी दुपारी १२ वाजेपर्यन्त गुगल फॉर्म मध्ये भरून या कार्यालयांस सादर करावी.

सोबत : वरीलप्रमाणे

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

E:\जाधव म.भा\परिपत्रक २०२४.docx

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल-desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

DTEM-D170TEQP/131/2024-DESK17 दिनांक : १७ ऑक्टोबर, २०२४

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
18 OCT 2024
आवक क्र. 8488

प्रति,
**सहसंचालक,**
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

विषय : **जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग राज्यास महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. कौशल्य-२०२४/प्र.क्र.५१/एसडी-६, दिनांक ११ जुलै, २०२४
२) संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. १७/तंशिसं/वुटेनबर्ग/तांत्रिक समिती/ २०२४/१३५, दि. २९ जुलै, २०२४
३) संचालनालयाचे पत्र क्र. DTEM-D170TEQP/109/2024-DESK17, दि. २९ जुलै, २०२४
४) शासन परिपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२४/ प्र.क्र.(१०१/२४)/तांशि-१, दि. १५ ऑक्टोबर, २०२४

महाराष्ट्र राज्यातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाचा पुरवठा युरोपियन देशांना करुन त्यायोगे कुशल कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग (Baden-Württemberg) राज्य यांचेशी दिनांक २५-०२-२०२४ रोजी सामंजस्य करार केलेला आहे. या कराराच्या अनुषंगाने जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग राज्यास ज्या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरवावयाचे आहे ती क्षेत्रे तसेच या पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने यंत्रणा, प्रशिक्षण व्यवस्था व कार्यपध्दती उपरोक्त संदर्भाधिन दिनांक ११ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेली आहे. त्याअनुषंगाने सदरचा पथदर्शी प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आपणांस संदर्भाधिन क्र. ३ च्या पत्रान्वये कळविण्यांत आलेले आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

तसेच सदरच्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती, राज्यस्तरीय सनियंत्रण समिती व ट्रेडनिहाय तांत्रिक समिती विहीत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदरच्या शासन निर्णयातील अ.क्र. २ (क) (३) मध्ये नमूद केलेल्या ट्रेड साठी संदर्भ क्र. २ च्या दिनांक २९ जुलै, २०२४ च्या कार्यालयीन आदेशान्वये संचालनालयस्तरावरुन तांत्रिक समिती गठित करण्यांत आलेली आहे.

आता राज्यस्तरीय कृती दलाच्या दिनांक १-१०-२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार उमेदवारांची नोंदणी व प्रशिक्षण याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सहयोग द्यावा असा निर्णय घेण्यांत आलेला असून, त्यास अनुसरुन विभागाच्या अधिनस्त शासकीय तसेच अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्र निकेतने यांना उपरोक्त संदर्भाधिन क्र. ३ च्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार सूचना देण्यांत आलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे)

तरी, आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्थांनी आतापर्यंत केलेल्या नोंदणीचा आढावा घेऊन याबाबतचा तिमाही अहवाल संचालनालयास **दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४** पर्यंत desk17@dtemaharashtra.gov.in या ई-मेल वर सादर करावा. तसेच यानंतर प्रत्येक तिमाहीनंतर सदरचा अहवाल संचालनालयास सादर करण्यांत यावा.

Signed by
Sunil Sukhadeo Bhamare
Date: 17-10-2024 14:49:56
(सुनिल भामरे)
सहसंचालक, तंत्र शिक्षण, म.रा., मुंबई

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी : अध्यक्ष, तांत्रिक समिती तथा संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

E:\desk-17\Mali\German-Württemberg\Letter.doc

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : DTEM-D170TEQP/109/2024-DESK17 दिनांक : 29/07/2024

प्रति,
**सहसंचालक,**
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

**विषय : जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग राज्यास महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. कौशल्य-२०२४/प्र.क्र.५१/एसडी-६, दिनांक ११ जुलै, २०२४ (संकेतांक क्र. २०२४०७१११५१५४५५८२१)
२) संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. १७/तंशिसं/वुटेनबर्ग/तांत्रिक समिती/२०२४/१३५, दि. २९ जुलै, २०२४

उपरोक्त विषयाचा सोबत जोडलेला संदर्भाधिन दिनांक ११ जुलै, २०२४ रोजीचा शासन निर्णय पहावा.

महाराष्ट्र राज्यातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाचा पुरवठा युरोपियन देशांना करुन त्यायोगे कुशल कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग (Baden-Württemberg) राज्य यांचेशी दिनांक २५-०२-२०२४ रोजी सामंजस्य करार केलेला आहे. या कराराच्या अनुषंगाने जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग राज्यास ज्या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरवावयाचे आहे ती क्षेत्रे तसेच या पथदर्शी प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने यंत्रणा, प्रशिक्षण व्यवस्था व कार्यपध्दती उपरोक्त संदर्भाधिन दिनांक ११ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेली आहे. उमेदवारांच्या अपेक्षित कौशल्यवृध्दी, वास्तव्य, न्याहारी, भोजन व इतर अनुषंगिक खर्चासाठी प्रशिक्षण वर्ग राबविणाऱ्या संस्थेस अनुदान प्राप्त होणार आहे. या योजनेच्या कार्यपध्दती व अंमलबजावणीबाबत तसेच वित्तीय भाराबाबतही संबंधित शासन निर्णयात नमूद करण्यांत आलेले आहे.

सदरच्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती, राज्यस्तरीय सनियंत्रण समिती व ट्रेडनिहाय तांत्रिक समिती विहीत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदरच्या शासन निर्णयातील अ.क्र. २ (क) (३) मध्ये नमूद केलेल्या ट्रेड साठी संदर्भ क्र. २ च्या दिनांक २९ जुलै, २०२४ च्या कार्यालयीन आदेशान्वये संचालनालयस्तरावरुन तांत्रिक समिती गठित करण्यांत आलेली आहे. बाडेन-वुटेनबर्ग राज्यामध्ये आवश्यक असलेल्या तांत्रिक मनुष्यबळासाठी प्रशिक्षण कार्यक्रम तयार करुन, त्या-त्या अभ्यासक्रमामधील कौशल्यधारकांना प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा स्तरावर अनुरुप प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याची जबाबदारी देखील सदरच्या तांत्रिक समितीची आहे.

त्याअनुषंगाने अभियांत्रिकी/हॉटेल मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या शासकीय पदविका संस्थांमधून आवश्यक ते प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्याची तयारी करुन, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे तांत्रिक समितीमार्फत अर्ज करावयाचा आहे.

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

कार्यालयीन आदेश : क्रमांक : १७/तंशिसं/वुटेनबर्ग/तांत्रिक समिती/२०२४/१३५
दिनांक : २९ जुलै, २०२४

संदर्भ : १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. कौशल्य-२०२४/प्र.क्र.५१/एसडी-६, दि. ११ जुलै, २०२४ (संकेतांक क्र. २०२४०७१११५१५४५५८२१)
२) दि. १५.०७.२०२४ रोजी संपन्न झालेल्या राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

महाराष्ट्र राज्यातील विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाचा पुरवठा युरोपियन देशांना करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग (Baden-Württemberg) राज्य यांचेशी दिनांक २५-०२-२०२४ रोजी सामंजस्य करार केलेला आहे. या कराराच्या अनुषंगाने दिनांक ११ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती, राज्यस्तरीय सनियंत्रण समिती व ट्रेडनिहाय तांत्रिक समिती विहीत करण्यात आलेली आहे. सदरच्या शासन निर्णयातील अ.क्र. २ (क) (३) मध्ये नमूद केलेल्या ट्रेड साठी तांत्रिक समितीची जबाबदारी संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे असून, त्यानुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन संचालक, तंत्र शिक्षण हे सदर ट्रेडस्‌साठी खालीलप्रमाणे तांत्रिक समिती गठित करीत आहेत. समिती अध्यक्षांना आवश्यकतेनुसार समितीतील इतर सदस्य निवडण्याची मुभा असेल.

| अ.क्र | समितीतील सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | डॉ. प्रमोद नाईक, संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई | अध्यक्ष |
| २ | डॉ. योगेश पाटील, संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| ३ | डॉ. राजेंद्र तलवारे, संचालक, मुल्यांकन व मूल्यमापन, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| ४ | श्री. चेतन रायकर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, स्ट्रक्टवेल डिझायनर व कन्सल्टंट प्रा. लि., तुर्भे, नवी मुंबई | सदस्य |
| ५ | डॉ. विठ्ठल बांदल, प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, अवसरी | सदस्य |
| ६ | श्री. नरेंद्र पाटील, प्रणाली विश्लेषक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई | सदस्य |
| ७ | श्रीमती व्ही. पी. वानखेडे, उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीने प्रत्येक अभ्यासक्रमासाठी एक अभ्यासगट नेमून संबंधित व्यवसायासाठी बाडेन-वुटेनबर्ग (Baden-Württemberg) राज्यामध्ये जो शैक्षणिक अभ्यासक्रम / तांत्रिक पात्रता विहीत केली आहे, त्या अभ्यासक्रमांशी महाराष्ट्रातील अभ्यासक्रमाची तुलना करुन महाराष्ट्राच्या अभ्यासक्रमात जे घटक नाहीत त्यांची यादी बनवून त्या घटकांचा समावेश असलेले प्रशिक्षण कार्यक्रम तयार करावे. तसेच त्या-त्या अभ्यासक्रमामधील कौशल्यधारकांना प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा स्तरावर अनुरुप प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याची जबाबदारी सदर समितीची असेल. तसेच संबंधित संस्थांची निवड करण्यासाठीचे निकष तयार करुन यासंदर्भातील एकूण कार्यपध्दती विहीत करण्याचे काम सदर समितीने करावे. तसेच संदर्भ क्र. २ वर नमूद केलेल्या दि. १५ जुलै, २०२४ रोजी संपन्न झालेल्या राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्र. २ नुसार व समितीने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार उपरोक्त समितीने कार्यवाही करावी.

उपरोक्त समिती सदस्यांना नियमानुसार अनुज्ञेय असणारा प्रवास भत्ता व दैनंदिन भत्ता महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे स्तरावरुन भागविण्यांत यावा.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहितीसाठी सादर : मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
प्रत पुढील कार्यवाहीसाठी : १) संबंधित समिती सदस्य (२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये गठित करण्यांत आलेल्या जिल्हा सनियंत्रण समितीत जिल्ह्यातील संबंधित प्राचार्य, तंत्र निकेतने हे सदस्य आहेत. त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या शासकीय पदविका संस्थांमधील सर्व प्राचार्यांना शासन निर्णयातील अ.क्र. २ (II) व (III) मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यांत याव्यात. तसेच संस्थेमध्ये सदरच्या प्रस्तावित प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने एका समन्वयकाची नियुक्ती करण्याबाबतही कळविण्यांत यावे.

सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या विभागातील संबंधित संस्थांमध्ये शासन निर्णयामध्ये प्रस्तावित प्रशिक्षण सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आढावा घेऊन, संबंधित संस्थेतील समन्वयकांचे नांव व मोबाईल क्रमांक नमूद केलेली एकत्रित यादी संचालनालयास दिनांक ३१ जुलै, २०२४ पर्यंत ई-मेल व्दारे पाठविण्यांत यावी.

तरी, आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी/हॉटेल मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या शासकीय पदविका संस्थांना याबाबत अवगत करुन सदरचा पथदर्शी प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही विभागीय कार्यालयाच्या स्तरावर करण्यांत यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी :
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण -२०२४/ प्र. क्र. (१०१/२४)/ तांशि- १,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १५ ऑक्टोबर, २०२४

**संदर्भ:** १. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. कौशल्य २०२४/प्र.क्र.५१/एसडी-६, दिनांक ११ जुलै, २०२४

२. युरोपीयन देशांना कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करण्याबाबतच्या राज्यस्तरीय कृती दलाच्या दिनांक ०१.१०.२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

**शासन परिपत्रक:**

जर्मनीतील बाडेन वुटेनबर्ग या राज्याशी कुशल मनुष्यबळाचा पुरवठा व व्यवसाय शिक्षण यासंदर्भात शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने दिनांक २५.०२.२०२४ रोजी सामंजस्य करार केला आहे. संदर्भ क्र. १ येथील दिनांक ११.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये पहिल्या टप्प्यात विविध ट्रेड्समधील १०,००० कुशल मनुष्यबळ त्या राज्यास उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. संदर्भ क्र. २ येथील बैठकीच्या इतिवृत्तानुसार उमेदवारांची नोंदणी व प्रशिक्षण याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सहयोग द्यावा, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरून विभागाच्या अधिनस्त शासकीय तसेच, अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-

१. शालेय शिक्षण विभागाचा दिनांक ११.०७.२०२४ रोजीचा शासन निर्णय स्वयंस्पष्ट असून राज्यातील कुशल व अकुशल युवा वर्गास जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग या राज्यात रोजगाराची संधी प्राप्त होणार आहे. सद्यस्थितीत शालेय शिक्षण विभागाच्या अधिनस्त असलेल्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेमार्फत इच्छुक उमेदवारांची नोंदणी करण्यात येत आहे.

२. राज्यातील शासकीय व अशासकीय तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालये यांनी विद्यार्थ्यांचे व युवा वर्गाचे यथाशक्ती समुपदेशन करून त्यांना या योजनेचे महत्त्व पटवून द्यावे. तसेच, इच्छुक उमेदवारांची तपशिलवार नोंदणी करावी.

३. संस्थांनी उपरोक्तप्रमाणे उमेदवारांचा ट्रेडनिहाय तपशिल राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे तसेच, संचालक, तंत्र शिक्षण यांना तिमाही सादर करावा.

४. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी स्वीकृती दिलेल्या उमेदवारांचे जर्मन भाषेचे प्रशिक्षण आपल्या संस्थेत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या सल्ल्याने व सहयोगाने आयोजित करावे.

५. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडून आवश्यकतेनुसार कौशल्यवृद्धीबाबत करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेऊन त्यानुसार प्रशिक्षण आयोजित करावे.

६. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात नमूद प्रति विद्यार्थी प्रति माह मानधन आपल्या संस्थेस अनुज्ञेय असेल.

७. उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या परवानगीने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेकडून मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. तथापि, तोपर्यंत उमेदवारांची नोंदणी संस्थास्तरावर करण्यात यावी.

८. संचालक, तंत्र शिक्षण यांनी विभागनिहाय संस्थांनी केलेल्या नोंदणीचा आढावा घेऊन शासनास तिमाही अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्रीकृष्ण पगारे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक

२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे २

४. सहसंचालक, सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)

५. सर्व प्राचार्य/ संचालक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/ तंत्रनिकेतने (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)

६. सर्व प्राचार्य/ संचालक, अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये/ तंत्रनिकेतने (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)

७. निवड नस्ती (तांशि १)